# - जाहिरात -

## मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर

क्र. आस्था./२०२४/२८७०　　　　　　　　　　　　　　दि. १८/०६/२०२४

मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या आस्थापनेवर **"वाहनचालक"** या पदाची सद्य:स्थितीत रिक्त असणारी ५ पदे व पुढील २ वर्षात रिक्त होणारी ३ पदे, अशा एकुण ८ पदांकरिता उमेदवारांची निवड यादी आणि ०२ उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यास परवानगी मिळालेली आहे. यासाठी, ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकाला, खालील नमुद पात्रता निकष पूर्ण करणा-या, निरोगी, इच्छुक व पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यासंदर्भात निवड यादी व प्रतिक्षा यादी ही प्रसिध्दीच्या दिनांकापासून २ वर्षासाठीच वैध राहील. सदर पदाची वेतन मॅट्रीक्स एस - १० : ₹ २९,२०० - ९२,३००/- अधिक नियमानुसार देय भत्ते अशी आहे.

**अ) पात्रता :-**

१) वयोमर्यादा :-

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| अराखीव (खुला) | २१ वर्ष | ३८ वर्ष |
| अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती किंवा इतर मागास प्रवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाने निर्दिष्ट केलेल्या विशेष मागासवर्गीय उमेदवारांसाठी | २१ वर्ष | ४३ वर्ष |
| विहीत मार्गाने अर्ज करणा-या न्यायालयीन / शासकीय कर्मचा-यांसाठी | २१ वर्ष | लागू नाही |

२) उमेदवार कमीत कमी एस.एस.सी (दहावी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.

३) उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

रोजगार मराठी

४) उमेदवाराकडे मोटर वाहन अधिनियम १९८८ (क्र. ५९/१९८८) प्रमाणे वैध व प्रभावीपणे कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (LMV) चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून असावा.

५) अर्ज करण्याच्या तारखेस उमेदवाराजवळ किमान ३ वर्ष हलके आणि / किंवा जड मोटर वाहन चालविण्याचा अनुभव असावा.

६) उमेदवाराचा पूर्व कार्यकाळ (रेकॉर्ड) वाहन चालक म्हणून स्वच्छ असावा.

७) उमेदवारास मोटर वाहनाची देखभाल व सर्वसाधारण दुरुस्तीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८) उमेदवारास नागपूर शहराची प्रादेशिक रचना (Topography) याची माहिती असावी.

९) उमेदवार शारीरिकदृष्ट्या सक्षम, सुदृढ आणि निर्व्यसनी असावा.

१०) चारचाकी मोटार वाहनाची देखभाल आणि किरकोळ दुरुस्ती या दोन्हीचा अधिकतम अनुभव आणि कार्यरत ज्ञान असणे आवश्यक आहे.

११) निवड झालेल्या उमेदवारांची प्रथम वैद्यकीय चाचणी केली जाईल. सक्षम प्राधिका-याने वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणित केल्यावरच त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

रोजगार मराठी

**ब) पात्र उमेदवारीकरीताच्या अटी :-**

१) उमेदवार करार करण्यास सक्षम असावा.

२) उमेदवारास नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले नसावे किंवा कोणत्याही न्यायालय / एम.पी.एस.सी / यु.पी.एस.सी किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याव्दारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींप्रक्रीयेमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरविले नसावे.

३) उमेदवारास फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविले नसावे किंवा फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

५) उमेदवार सद्य:स्थितीत न्यायालयीन / शासकीय सेवेत असल्यास, त्याने / तिने विद्यमान कार्यालयाची पूर्वपरवानगी घ्यावी आणि ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. अशा उमेदवाराने नागपूर खंडपीठ प्रशासनाने निर्देशित केल्याप्रमाणे सदर प्रमाणपत्र सादर करावे.

**क) <u>उमेदवारांची अल्पसुची</u> :-**

जहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार अल्पसुची (Shortlisting) करण्याचे सर्व अधिकार प्रशासन, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर, यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

**ड) <u>ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत:-</u>**

१) अर्ज सादर करताना https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुनच अर्ज सादर करावा.

२) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकाराने अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

3) पात्रता असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईटव्दारे दिनांक १९/०६/२०२४ ते दिनांक ०३/०७/२०२४ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जाची लिंक दिनांक **१९/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडेल आणि दिनांक ०३/०७/२०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता बंद होईल.**

४) उमेदवारांनी संपूर्ण जाहिरातीचे वाचन करुनच अर्ज भरावा. संपूर्ण भरलेला अर्ज Submit केल्यानंतर त्या अर्जाची Printout काढावी. सदरील अर्ज उमेदवाराने

स्वत:जवळ निवड प्रक्रियेसाठी जतन करुन ठेवावा. **सदरील अर्ज आणि शैक्षणिक कागदपत्रे या कार्यालयात पोष्टाने पाठवू नये.** मात्र निवड प्रक्रियेदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार आवश्यकतेनुसार सदरील अर्जाची प्रत आणि कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत.

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट साईज चा फोटो (३.५ सें.मी X ४.५ सें.मी) व स्वत:ची स्वाक्षरी (३ सें.मी X २.५ सें.मी) स्कॅन करुन ४० KB पेक्षा जास्त साईज होणार नाही अशा पध्दतीने दोन स्वतंत्र फाईल्स **.jpg/.jpeg format** मध्ये करुन ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप : फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी). प्रवेशपत्रावर / अर्जावर दुसऱ्याचा फोटो / स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

६) उमेदवाराने एकापेक्षा जास्त ऑनलाईन अर्ज सादर केल्यास उमेदवाराच्या फक्त शेवटच्या अर्जाचा विचार करण्यात येईल.

७) उमेदवाराने https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वर क्लिक करुन Recruitment मध्ये Staff Car Driver च्या Apply Online पर्यायावर वर क्लिक करावे. तद्नंतर, **SBICollect** व्दारे ऑनलाईन फी भरावी. तद्नंतर SBICollect Reference Number प्राप्त होईल त्याचा वापर करुन ऑनलाईन फॉर्म भरावा.

८) उमेदवाराने आपली सर्व माहिती योग्यरित्या भरुन झाल्यावर सर्वात शेवटी I Agree बटणावर क्लिक करुन अर्ज प्रस्तुत (Submit) करावा.

९) उमेदवाराने स्वत:च्या माहितीस्तव जो फॉर्म भरलेला आहे त्याची प्रत Print Application मध्ये जाऊन Registration ID No. टाकून Print काढून स्वत:कडे जतन करुन ठेवावी.

१०) ऑनलाईन फॉर्म भरत असताना आपण जाहिरातीतील नमुद शैक्षणिक पात्रता / अनुभव / इतर बाबींची पूर्तता केली असेल तरच आपला अर्ज स्विकारला जाईल.

**ड) <u>ऑनलाईन नोंदणी शुल्क आणि त्याबाबत सुचना</u> :-**

१) उमेदवाराला अर्ज करतांना नोंदणी शुल्क **₹ २००/-** (रूपये दोनशे मात्र) **'SBICollect'** व्दारे ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. सदर शुल्क हे नापरतावा आहे. त्यासाठी उमेदवारांनी **'User Manual'** मध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

२) अर्ज स्विकारण्यासाठी फक्त यशस्वीरित्या नोंदणीशुल्क खात्यात जमा झालेल्या व्यवहारांचाच विचार केला जाईल.

३) **'SBICollect'** सुविधेव्दारे तयार केलेले नियम, अटी व शर्तींची कोणतीही जबाबदारी मुंबई उच्च न्यायालयाच्या, नागपूर खंडपीठ प्रशासनाची नाही. ऑनलाईन पेमेंट करताना काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील. या बाबत कोणत्याही स्वरुपाची चौकशी / दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

**फ) <u>ज्या उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलविण्यात येईल, त्यांनी खालील कागदपत्रांच्या स्वत:प्रमाणित छायांकित प्रती त्यांच्या मुळ प्रमाणपत्रांसह पडताळणी साठी मुलाखतीच्या वेळी सोबत आणाव्यात</u> :-**

१) जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / एस.एस.सी चे बोर्ड प्रमाणपत्र). (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority/Board Certificate of SSC)

२) शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक.

३) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र.

४) जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेली चारीत्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र, प्रतिष्ठीत व्यक्तींचा हुद्दा, पत्ता व फोन नंबर नमुद असावा (जाहीरातीसोबत "नमुना ब" नुसार)

५) वैध व प्रभावीपणे कार्यरत वाहन परवान्याची (ड्रायव्हींग लायसन्स) प्रत.

६) मोटार वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव प्रमाणपत्र, प्रमाणपत्रावर जारी करणाऱ्या संस्थेचे / व्यक्तीचे नांव, अशासकीय संस्था असल्यास संस्थेचा नोंदणी क्रमांक, स्वाक्षरी, पत्ता तसेच संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

७) चारचाकी मोटार वाहन दुरुस्ती / देखभालीचे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र, प्रमाणपत्रावर जारी करणाऱ्या संस्थेचे / व्यक्तीचे नांव, अशासकीय संस्था असल्यास संस्थेचा नोंदणी क्रमांक, स्वाक्षरी, पत्ता तसेच संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

८) तत्सम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी)

९) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

१०) सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

११) लहान कुटुंबाबाबत स्वयं घोषणापत्र. (जाहिरातीसोबत "नमुना अ" नुसार)

१२) उमेदवार न्यायालयीन / शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१३) उमेदवाराच्या नावात बदल झालेला असल्यास नावाच्या बदलाबाबत शासकीय राजपत्राची / विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.

१४) संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह.

१५) न्यायालय प्रशासनाने मागणी केलेले इतर कोणतेही दस्तऐवज.

**ग) परिक्षेची योजना :-**

१) आलेल्या अर्जांची छाननी केल्यानंतर अल्प सुची प्रमाणे पात्र उमेदवारांना पुढील निकषांप्रमाणे निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

(१) चाळणी/ लेखी परीक्षा - २० गुण (उत्तीर्ण गुण किमान ७)

लेखी चाचणीसाठी प्रश्नपत्रिकेमध्ये खालील विषयांवर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे प्रश्न असतील. (i.e. objective type and multiple choice questions).

अ) वाहनांची देखभाल व किरकोळ दुरुस्ती विषयक ज्ञान.

रोजगार मराठी

ब) नागपूर शहर, त्यालगतची महत्वाची स्थळे व रस्त्यांची माहिती.

क) सामान्य ज्ञान.

सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रीकेत एकुण २० प्रश्न ठेवण्यात येणार असुन प्रत्येक प्रश्नास ०१ गुण असेल. प्रश्नपत्रीकेचे प्रश्न मराठी भाषेत असतील.

(२) मोटर वाहन चालवण्यासंबंधी परिक्षा - १० गुण (उत्तीर्ण गुण किमान ७) (प्रादेशिक परिवहन कार्यालय अधिकाऱ्यांमार्फत)

(३) पूर्वानुभव - १० गुण

(४) वैयक्तिक मुलाखत - १० गुण

**निवड प्रक्रियेचे एकुण गुण - ५० (उत्तीर्ण गुण किमान ५०% म्हणजे २५ गुण)**

<u>**टिप**</u> **१:** चाळणी/ लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना गुणवत्तेच्या आधारे मोटर वाहन परिक्षेसाठी बोलविण्यात येईल व मोटर वाहन परिक्षा चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्यास वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

<u>**टिप**</u> **२:** उमेदवारांची निवड ही उक्त नमुद निकषांमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार केली जाईल.

२) परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. प्रवेश प्रमाणपत्र सोबत नसल्यास परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

३) अल्पसुचीत पात्र उमेदवारांसाठी लेखी परीक्षा, मोटार वाहन परिक्षा तसेच तोंडी मुलाखतीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाचे संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल. यासाठी उमेदवारांने संकेतस्थळावर वेळोवेळी भेट द्यावी. उमेदवाराने परिक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र 'Admit Card' वर क्लिक करुन त्याची प्रिंट काढून घ्यावी.

**ह) <u>उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना</u> :-**

१) कोणत्याही वैध कारणामुळे भरती प्रक्रीया रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३) अर्जदार जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजुन त्याला लेखी परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती / नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास त्याचे/तिचे नाव निवडप्रक्रीयेतुन वगळण्यात येईल.

४) केवळ अर्ज दाखल केला यावरुन चाळणी / लेखी परीक्षा किंवा नेमणूकीसाठी पात्र ठरणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हा सदर निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

५) मोटार वाहन परीक्षा तसेच मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी त्यांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात. तसेच या कार्यालयास मान्य होईल असे स्वत:चे फोटो प्रमाणपत्र **(Photo ID)** जसे मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी एखादा पुरावा आणावा.

६) पात्र उमेदवारांना (नेमलेल्या तारखांना) लेखी परीक्षांसाठी, मोटार वाहन परिक्षांसाठी व तोंडी मुलाखतीसाठी स्व:खर्चाने हजर राहावे लागेल.

७) कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते असा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल.

८) उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतीची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस लेखी परिक्षेस, मोटारवाहन परिक्षेस किंवा मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर, प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार / दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

९) अपुर्ण / चुकीची माहिती असलेला अर्ज नाकारला जाईल. उमेदवाराने दिलेला कोणताही तपशील खोटा किंवा चुकीचा असल्याचे आढळल्यास, उमेदवाराला निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि नियुक्त झाल्यास त्याला काढून टाकण्यात येईल. कोणतीही वस्तुस्थिती दडपल्यास अर्ज नाकारला जाईल.

१०) उमेदवाराने लेखी परीक्षा तसेच मोटरवाहन परिक्षेमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे, तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने तोंडी मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर तोंडी मुलाखतीसाठीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल. फक्त पात्र उमेदवारांचीच तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

११) उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करण्याऱ्या अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना भेटाण्याचा किंवा त्यांच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणा मार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१२) निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल.

१३) निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरुवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जाऊ शकतात.

१४) या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

सही/-
रविन्द्र म. सादराणी
प्रबंधक (प्रशासन)
मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ,
नागपूर

नागपूर
दि. १८/०६/२०२४

# ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना

१) ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने वाहनचालक पदासंबंधीची संपूर्ण जाहिरात वाचावी. ऑनलाईन अर्ज हा इंग्रजी भाषेत भरला जाईल.

२) ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी स्वतंत्र स्कॅन करुन **४० KB** पेक्षा जास्त साईज होणार नाही अशी **..jpg/.jpeg format** मध्ये दोन वेगवेगळ्या फाईल्स तयार ठेवाव्यात.

३) ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचुक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

४) उमेदवाराने माहिती भरताना संपूर्ण नावाचे (Spelling) त्याच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचुक नमुद करावे.

५) उमेदवाराने पत्रव्यवहाराचा अचुक पत्ता व पिनकोडसहीत द्यावा अर्धवट पत्ता देऊ नये.

६) उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल, मोबाईल क्रमांक द्यावा.

७) उमेदवाराने आपली जन्मतारीख शैक्षणिक कागदपत्रे अथवा जन्म प्रमाणपत्राप्रमाणे अचुक लिहावी.

८) उमेदवाराने स्वत:चा आधार कार्ड क्रमांक अचुक नमूद करावा.

९) उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचुक शैक्षणिक माहिती भरावी.

१०) उमेदवारास ज्या भाषांचे ज्ञान आहे त्यांची नोंद करावी.

११) उमेदवाराने वाहन चालविण्याचा अनुभव नमूद करावा.

१२) उमेदवाराने त्याच्याकडे असणाऱ्या वैध व प्रभावीपणे कार्यरत वाहन परवान्याची संपूर्ण व अचुक माहिती भरावी.

१३) उमेदवाराकडे चारचाकी मोटार वाहनाची देखभालीचे व दुरुस्तीचे ज्ञान याबाबतची अचुक माहिती भरावी.

रोजगार मराठी

१४) उमेदवाराने त्याला ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींकडून चांगली वर्तणूक व चारित्र्याबाबतचा दाखला प्राप्त करावा आणि अर्ज भरतांना सदरील व्यक्तींची माहिती अर्जात नमूद करावी. सदरील दाखला हा जाहिरात प्रसिध्दिनंतरच्या तारखेचा असावा. सदरील प्रतिष्ठित व्यक्ती ही उमेदवाराची जवळची नातेवाईक / मित्र नसावी.

१५) उमेदवारास असलेल्या अपत्यांविषयीची योग्य ती माहिती सदरील रकान्यात भरावी. विवाहित उमेदवारास आज रोजी अपत्य नसेल तर त्याने रकान्यात "०" (शुन्य) अशी माहिती भरावी.

१६) ज्या-ज्या शैक्षणिक प्रमाणपत्रांवर CGPA / SGPA or grade देण्यात येते, तेथे संबंधीत बोर्ड / विद्यापीठ / संस्थेच्या निकषांनुसार शेवटच्या वर्षातील एकूण गुण व अर्जदारास मिळालेले एकुण गुण, शैक्षणिक पात्रतेच्या रकान्यात नमुद करावेत.

१७) उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी. खरी माहिती दडवून ठेवल्यास उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरेल. नियुक्तीनंतर सदर माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नोकरीवरुन कमी केले जाईल.

१८) उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, ४० केबी पेक्षा कमी आकार असलेल्या स्वत:च्या स्कॅन फोटोची आणि स्कॅन स्वाक्षरी .jpg / .jpeg format मधील फाईल Upload करावी.

१९) अर्ज Submit करण्यापूर्वी उमेदवाराने भरलेला अर्ज बरोबर आहे याची खात्री करावी, Declaration चे वाचन करावे व नंतरच I Agree या बटणावर Click करावे. अर्ज Submit झाल्यावर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

२०) अर्ज Submit झाल्यानंतर येणारा Registration ID Number उमेदवाराने नमूद करुन घ्यावा आणि Print Application हा पर्याय Select करुन ऑनलाईन अर्जाची Print out काढावी.

# नमुना 'अ' (‘Form ‘A’)

## घोषणापत्र

मी, श्री/श्रीमती/कु ..............................................................................................

श्री ............................................................................................ यांचा मुलगा / मुलगी / पत्नी, वय .............................. वर्षे, राहणार ............................................... याव्दारे पुढील प्रमाणे जाहीर करतो / करते की,

१) मी वाहनचालक या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२) आज रोजी मला ................. (संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ................ आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्‌नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

४) मी असेही जाहीर करतो / करते की, माझ्या विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा माझ्या विरुध्द फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझ्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही झालेली नाही.

५) ह्या जाहिरातील नमूद केलेल्या सर्व सूचना व अटी मला मान्य आहे.

दिनांक : / /

ठिकाण : ................................ उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

**<u>टिप</u>** - अविवाहीत उमेदवारांनी लागू नाही असे नमूद करून स्वत:ची स्वाक्षरी करावी.

# नमुना 'ब' (‘Form ‘B’)

## <u>चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ..........................................................................

हे / ह्या गाव ............................ तालुका ................................, जिल्हा ..................................., येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ..................... वर्षापासून ओळखतो / ओळखते, त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते / त्या माझे / माझे नातेवाईक नाहीत.

करिता सदरील वर्तणूक / चारित्र्य प्रमाणपत्र वाहनचालक पदाकरिता देण्यात येत आहे.

**ठिकाण :-** ..........................

**दिनांक :-** ..........................

**प्रमाणपत्र देणाऱ्याचे नाव, हुद्दा व सही**

**सही:-**........................................................

**नाव.:-**......................................................

**हुद्दा:-**.....................................................

**पत्ता:-**.....................................................

....................................................................

....................................................................

**भ्रमणध्वनी क्रमांक :-** .........................